नि. फौ. ख. क्र. १५९/२०२१ निशाणी २३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – सुनंदा रमेश फुकट

वय – ६० वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – आगर, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त.अ.सादीक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी आरोपींना ओळखते. ते माझे नातेवाईक आहेत. ते आमचे शेजारी राहतात. दि. ०१.१२.२०२० रोजी सकाळी ०६.३० वाजता घटना घडली. त्यावेळी मी झाडत होती, माझे दिर प्रमोद फुकट आले आणि माझ्याकडे पैशांची मागणी करुन मला अचानक मारायला आले. त्यांनी माझा उजवा हात त्यांच्या तोंडात घेतला आणि माझा हात रक्तबंबाळ केला. माझ्या बोटातुन खुप रक्त वाहत होते. प्रमोद रामभाऊ फुकट, सुनिल रामभाऊ फुकट, गजानन भांडे, रामभाऊ फुकट असे चौघेही माझे ओटयावर आले व मला शिवीगाळ करु लागले. त्यांनी मला व माझे कुटुंबियांना मारण्याच्या धमक्या दिल्या आणि निघुन गेले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेली. भांडणाचे कारण पैसे होते. आता मला जबानी रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२४** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येत आहे. पोलीसांनी येवुन जागेची पाहणी केली. पोलीसांनी माझ्याकडे विचारपुस करुन माझे बयान नोंदविले. पोलीसांनी मला प्राथमिक आरोग्य केंद्र, आगर येथे पाठविले होते. आजरोजी आरोपी रामभाऊ आणि गजानन भांडे न्यायालयात हजर आहे. इतर आरोपींना पाहिल्यास ओळखु शकते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. पाटकर यांचे मार्फत–**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती सावकारी व्यवहार करतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती, मुलगा तसेच माझे दिर यांचेत शेतीच्या पुर्वीचा वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ प्रमोद फुकट सरकारी नोकरी करतो आणि

अकोला येथे राहतो. माझे दिर सुनिल फुकट खाजगी नोकरी करतो आणि ते पुणे येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, माझे दिर पैशाची मागणी करुन मला मारायला लागले ही बाब मी माझे रिपोर्ट देतांना सांगितली नव्हती. आमच्या घराला एक मुख्य दरवाजा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या मुख्य दरवाज्या पर्यंत आमचे बांधकाम असुन तिथपर्यंत आमचा अधिकार आहे. आम्ही मुख्य दरवाज्यासमोर टिनशेडचे बांधकाम केलेले आहे. टिनशेडच्या बाजुने बाहेर जाण्यासाठी एक लोखंडी दरवाजा आहे. हे म्हणणे खरे नाही की, टिनशेड आणि लोखंडी गेटची जागा अतिक्रमीत जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, टिनशेड आणि लोखंडी गेटची जागा मारोती संस्थानची असुन आम्ही ताब्यात घेतली आहे. आमच्या घराच्या बाजुला सरकारी पाण्याची टाकी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर टाकीचा वापर आम्ही कुटार किंवा कापुस ठेवण्यासाठी करत असतो.

३. हे म्हणणे खरे नाही की, अतिक्रमीत जागेवरुन जाणेयेणेच्या जागेवरुन आमचे व आरोपींचे वाद झाले होते. पोलीसांनी माझे बयान घटनेच्या दिवशी दुपारी नोंदविले होते. रामभाऊ फुकट हे माझे चुलत सासरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची शेती माझे पतीने खरेदी केली परंतु त्याना पैसे दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, लोखंडी गेटमध्ये बोट अडकुन मला बोटावर जखम झाली. दि. ०१.१२.२०२० हे थंडीचे दिवस असतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जास्त थंडी होती. हे म्हणणे खरे नाही की, मी झाडु करत नव्हते, दरवाज्या मध्ये माझे बोट अडकल्याने मला जखम झाली. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०१.१२.२०२० रोजी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटा पुरावा दिलेला आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.03.26 10:57:46 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

बाळापूर.
दि.२५/०३/२०२५